माझे मत

'स्वरा ग्रुप'चा प्रवास ग्राहकांच्या उत्तरोतर वाढत गेलेल्या प्रतिसादामुळेच अविस्मरणीय बनत गेला आहे. ग्राहक या शब्दापुरते मर्यादित न राहता नाती जोडत गेलो. गोड आठवणी जपत कौटुंबिक नाती नकळत निर्माण झाली. नात्यात जिव्हाळा निर्माण झाला, की होणारा प्रवाससुद्धा छान होत राहतो. अधिक ऊर्जेने काम करण्यास हुरूप येतो. अजूनही खूप दूरचा पल्ला गाठायाचा आहे, पण याबरोबरच 'स्वरा ग्रुप'चे व्यावसायिक सिद्धांत व उद्देश हा इतरांच्या आनंदाचे कारण बनण्यात आनंद मिळविणे आहे.

- राहुल मुरकुटे, व्यवस्थापकीय संचालक, स्वरा ग्रुप ऑफ हॉटेल्स अँड रिसॉर्ट

पर्यटकांचे लाडके डेस्टिनेशन : 'स्वरा ग्रुप'चे 'मल्हार माची'

मुळशी धरणाच्या रम्य परिसरात **'स्वरा ग्रुप ऑफ हॉटेल्स अँड रिसॉर्ट'**च्या वतीने २०१० मध्ये स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर **'मल्हार माची'** हे रिसॉर्ट सुरू करण्यात आले. हॉस्पिटॅलिटी क्षेत्रातील दीर्घ अनुभव असलेल्या 'स्वरा ग्रुप'ने त्यानंतर 'जलसृष्टी' आणि 'नभानंत' या दोन रिसॉर्टची निर्मिती केली. या रिसॉर्टमुळे पर्यटनाबरोबरच वेडिंग डेस्टिनेशनचाही पर्याय 'स्वरा ग्रुप'कडून उपलब्ध झाला आहे. सामान्य परिस्थितीतून संघर्ष करीत मुरकुटे कुटुंबीयांनी उभारलेल्या रिसॉर्ट विश्वाची ही प्रेरणादायी कहाणी...

मल्हार माची परिसरातील नूतन वास्तू - नभानंत लक्झरी रिसॉर्ट

जलसृष्टी लक्झरी आयलँड रिसॉर्ट

मल्हार माची लक्झरी माऊंटन रिसॉर्ट

SwaRā
GROUP OF HOTELS & RESORTS

मुळशी धरणाच्या रम्य परिसरात 'स्वरा ग्रुप ऑफ हॉटेल्स अँड रिसॉर्ट'च्या वतीने २०१० मध्ये स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर 'मल्हार माची' हे रिसॉर्ट सुरू करण्यात आले. ते कमालीचे लोकप्रिय झाले. त्यानंतर 'जलसृष्टी' आणि आता नव्याने सुरू झालेले 'नभानंत' या रिसॉर्टमुळे पर्यटनाबरोबरच वेडिंग डेस्टिनेशनचाही पर्याय 'स्वरा ग्रुप'कडून उपलब्ध झाला आहे. 'मल्हार माची'चे वैशिष्ट्य म्हणजे ते माऊंटन रिसॉर्ट आहे, तर जलसृष्टी आयलँड रिसॉर्ट आहे. 'मल्हार माची' उभारताना बाणेरमध्ये २००२ मध्ये सुरू झालेल्या 'भैरवी प्युअर व्हेज'चा अनुभव पाठीशी होता.

डॉ. बाबूल पठाण आणि रामदास मुरकुटे यांच्या अलिखित भागीदारीतून 'मल्हार माची' प्रत्यक्षात आलं. हा सर्व प्रवास रंजक आहे.

डॉ. पठाण आणि श्री. मुरकुटे हे साहेब आणि भाऊ या नावाने ओळखले जातात. भाऊंचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झालेला. एकोणीसशे ऐंशीच्या दशकात अर्थार्जनसाठी ते रिक्षा चालवत होते. त्यापूर्वी त्यांनी काही काळ सेनापती बापट रस्त्यावरील शेती महामंडळात सिक्युरिटी म्हणून काम केले होते. भाऊ रिक्षा चालवायचे, त्याच काळात साहेब विद्यापीठात प्रोफेसर होते. ते मानववंशशास्त्रामध्ये पीएच. डी. आहेत. ते भाऊंच्या रिक्षेतून बऱ्याचदा विद्यापीठात जात असत. त्या ओळखीचे रूपांतर घनिष्ठ मैत्रीमध्ये झाले. एकदा बोलता बोलता त्यांनी भाऊंकडे कोठे जमीन विकायची आहे का, अशी विचारणा केली. भाऊंनी ओळखीची जागा सुचवली आणि योगायोगाने पहिला व्यवहार पार पडला. चोख आणि पारदर्शक व्यवहारामुळे गावातल्या आणखी लोकांनी त्यांना त्यांच्या जमिनी विकण्याबाबत विचारणा केली. आणि साहेब आणि भाऊंची कसल्याही लिखापढीशिवाय पार्टनरशिप सुरू झाली. दरम्याच्या काळात दोघांचीही पुढची पिढी व्यवसायात आली, ती म्हणजे भाऊंची विश्वास व राहुल ही मुलं आणि साहेबांचा शाहिक.

निसर्गाच्या सान्निध्यातील 'मल्हार माची रिसॉर्ट'

मुळशी येथील 'मल्हार माची माऊंटन रिसॉर्ट' ज्या जागेवर उभे आहे, ती जमीन १९९५ मध्ये भाऊ आणि डॉ. पठाण यांनी शेती करायच्या उद्देशाने खरेदी करून ठेवली होती. डोंगराळ आणि ओसाड भागात जेथे पाणीसुद्धा उपलब्ध नव्हते, अशा ठिकाणी शेती करायचा विचार करणे हेच मुळात शिवधनुष्य उचलण्यासारखे होते. सुरुवातीला फार्म हाऊसपुरता प्लॉट घेण्याच्या विचाराने बघायला गेलेली ही जोडी एजंटच्या विचित्र अटीने १२५ एकर जमीन खरेदी करून आली. पण डोंगरमाथ्यावरून उगवता सूर्य, हिरवळ, दुर्मीळ झाडी, नैसर्गिक देवराई, गुहा, मुळशी धरणाचे विहंगम दृश्य, त्याच पाण्यावर पडणारी सूर्यास्ताची सोनेरी किरण, असा देखणा नजारा या पूर्ण जमिनीसोबत नकळत मिळाला. व्यवहार पूर्ण झाल्यावर काही दिवस शेतीच करायच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाला. विहीर खणली. ते पाणी दोन किलोमीटर लांबून पाईप जोडून या जमिनीपर्यंत आणण्यात आले. काजू, जांभूळ अशा फळझाडांबरोबर भात आणि गहू लागवडदेखील केली. २००२ नंतर रम्य ठिकाणी रिसॉर्टची उभारणी करून पर्यटकांना आकर्षित करणे हा व्यवसाय जोर धरू लागला होता. त्यातूनच एक छोटे रिसॉर्ट उभारण्याची कल्पना पुढे आली. त्यातून 'मल्हार माची माऊंटन रिसॉर्ट' १५ ऑगस्ट २०१० ला सुरू झाले. या सर्व परिसराचा आवाका पाहता रिसॉर्ट उभे करण्याबरोबरच ते सांभाळणे आव्हान होते. सुरुवात २० रूम्सने झाली. त्याशिवाय १०० लोकांसाठीचा हॉल, स्पा सेंटर, इनडोअर गेम्स, डान्स फ्लोअर, जंगल सफारी, तसेच दोन डोंगरांना जोडणारी दीड किलोमीटर लांबीची देशातील दोन नंबरची झिप लाईन अशा सोयीसुविधा उपलब्ध करण्यात आल्या. निसर्गाच्या देणगीला कोठेही धक्का न लावता सर्व गोष्टी जपत प्रत्येक रूम्सला खासगी स्वरूप राहावे अशा पद्धतीने अंतर ठेवण्यात आले. कुटुंबीयांबरोबर व्यतीत होणारा वेळ हा जास्तीत जास्त व्यक्तिगत आणि शांत मिळावा, याची पुरेपूर काळजी घेण्यात आली.

'स्वरा ग्रुप'चा विस्तार

'स्वरा ग्रुप' हॉटेल आणि रिसॉर्टच्या क्षेत्रात लवकरच पुढचे पाऊल टाकत आहे. सुस-नांदे रस्त्यावर डोंगराच्या कुशीत एक सुंदर रेस्टॉरंट उभारण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. रेस्टॉरंट-बारबरोबरच फॅमिली सेक्शन, गार्डन एरिया, लॉन, भव्य कॉन्फरन्स हॉल अशा सुविधा तेथे असतील. तसेच लवकरच 'मल्हार माची रिसॉर्ट'मध्ये जांभळाच्या बागेत व्हेज रिसॉर्ट सुरू करायचा 'स्वरा ग्रुप'चा मानस आहे.

विलक्षण अनुभूती देणारी देवराई

देवराई म्हणजे देवाच्या नावाने पावित्र्य राखत सांभाळले जाणारे जंगल. दुर्मीळ गर्द झाडी प्रकारात मोडला जाणार हा परिसर तसा महाराष्ट्रामध्ये क्वचितच आढळतो. मल्हार खंडोबाचे नाव आणि माची म्हणजे डोंगराचा सर्वात उंच भाग अथवा माथा. खरेतर हे तेथील मूळ गावानेच या परिसराला दिलेले नाव 'मल्हार माची'. ते जसेच्या तसे रिसॉर्ट बांधल्यावरसुद्धा पुढे राखत गावकऱ्यांच्या भावनांचा आदर केला. निसर्गाने भरभरून दिलेल्या परिसरातील 'देवराई' विलक्षण अनुभूती ठरते आहे. देवराईसोबत नैसर्गिक तूला गुहा आणि वाघजाई देवीच्या मंदिराचा परिसर डोळ्यांत साठविताना एका वेगळ्या आणि विलक्षण गोष्टीची अनुभूती होत राहते.

'मल्हार माची'ने जपलेय गावाचे गावपण

भव्य परिसराचा वापर करीत 'मल्हार माची रिसॉर्ट'मध्ये शंभर-दीडशे गायीगुरांचा गोठा उभारला आहे. पाळीव प्राण्यांबरोबरच पक्षी, ससे-इमूपालन, शेळ्या, दोनशे-अडीचशे गावरान कोंबड्या येथे आहेत. गायीच्या शेणापासून तयार होणारा गोबर गॅस किचनला पुरविला जातो. सुयश प्लँटद्वारे वॉश बेसिन आणि बाथरूमचे पाणी फिल्टर करून शेती आणि बागेला वापरले जाते. सोलर प्लांट बसवून त्याद्वारे १२० किलोवॅट वीजनिर्मिती केली जाते. फुलझाडे, फळझाडे, शेती, पशुपालन हे येथील आकर्षण आहे. येथे उत्पन्न होणारे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, फळे, पालेभाज्या येथील जेवणात वापरल्या जातात. येथील रानात बहरलेली फुलेसुद्धा येथे सजावटीसाठी वापरली जातात. हर्बल गार्डनमध्ये वेगवेगळ्या जातीच्या, तसेच मसालाच्या दुर्मीळ वनस्पती आढळतात. येथे सकाळी गेस्टसाठी हर्बल टी काऊंटरही लावले जाते. या चहामध्ये लवंग, तमालपत्र, वेलदोडे, ओवा, वेखंड असे वेगवेगळे मसाले वापरलेल्या ग्रीन टीचा आस्वाद गेस्ट घेऊ शकतात.

मुळा नदीच्या पात्रातील 'जलसृष्टी आयलँड रिसॉर्ट

'मल्हार माची'च्या अनुभवाच्या जोरावर 'स्वरा ग्रुप'ने 'जलसृष्टी' हे रिव्हर आयलँड रिसॉर्ट सुरू केले. 'जलसृष्टी'ची जागा मुरकुटे कुटुंबीयांनी २००७ मध्ये शेतीसाठी घेतली होती. सुरुवातीला फणसाची काही झाडे, अननसाची ३००, काजूची ४००, नारळाची २५० झाडे अशी लागवड केली. पुढे या जागेत १ जानेवारी १०१४ रोजी भाऊंनी 'स्वप्नदीप कृषी पर्यटन', जे 'जलसृष्टी रिसॉर्ट' नावाने ओळखले जाते ते सुरू केले. गेल्या दहा वर्षांत कृषी पर्यटनाबरोबर आता 'जलसृष्टी'ची ओळख लक्झरी आयलँड रिसॉर्ट म्हणूनही झाली आहे. ते मुळा नदीच्या अगदी मधोमध आहे. स्पीड बोटीने रिसॉर्टची पूर्ण वर्तुळाकर सफर करीत तुम्ही रिसॉर्टमध्ये प्रवेश करता. 'जलसृष्टी आयलँड रिसॉर्ट' हे चोहोबाजूंनी पाण्याने वेढलेले असल्याने मुळात या आयलँड रिसॉर्टला निसर्गाची देणगी लाभलेली आहे. दिवसाची सुरुवात नदीच्या पात्रात अगदी मधोमध पडणाऱ्या सूर्यकिरणांनी होते. घनदाट झाडी, सभोवताली पसरलेल्या डोंगररांगा आणि लक्झुरिअस सोयीसुविधा तुमचा येथील मुक्काम अविस्मरणीय करतात. नैसर्गिक जैवविविधतेने संपन्न अशा या युनिक लोकेशनमध्ये वीस सुसज्ज आणि प्रशस्त रूम्स असलेले हे रिसॉर्ट आहे. हॉर्स रायडिंग, सायकलिंग, ट्रॅक्टर सफारी, निसर्ग भटकंती, टॉवरवरून पक्षी निरीक्षण यांसारख्या आऊटडोअर ॲक्टिव्हिटीजबरोबरच कॅरम, बुद्धिबळ, स्नूकर, सापशिडीसारखे इन्डोअर खेळ खेळत, येथील लायब्ररीमधील पुस्तक चाळताना वेळ मजेत जातो. रिसॉर्टमध्ये मुक्त भटकंती करताना नजरेस पडणारी दुर्मीळ कातळशिल्पे डोळ्यांत साठवून ठेवण्यासारखी आहेत. मुक्त संचार करणारे पक्षी, मनमोहक फुलांची बाग, शेतात फेरफटका या सगळ्या गोष्टी मन प्रसन्न करतात. सेंद्रिय पद्धतीने शेतात पिकविली जाणाऱ्या फळे-पालेभाज्या येथील वेगवेगळ्या रेसिपीजमध्ये वापरल्या जातात.

शिवाय, येथे व्हेज आणि नॉन व्हेजसाठी स्वतंत्र किचन्स आहेत. अलीकडेच सुरू केलेल्या जलनौका या रूम्स कोस्टल थीमचा फील देतात. 'जलसृष्टी'च्या सर्व रूम्स लाकूड वापरून तयार केल्या आहेत. सीलिंगला काचेचा वापर केल्याने काचेतून नदीचे आणि वरच्या बाजूने झाडाचे दृश्य नजरेस पडते. रूम्समधील प्रकाशव्यवस्था, बैठक, झोपाळा, समुद्र किनाऱ्यावरची वाळू, त्यामधील लहान मुलांची खेळणी, रिव्हर साईड जाकुझीबरोबरच बाथरूममधील लहानसहान वस्तू एखाद्या क्रूझच्या प्रवासाची अनभूती देतात. नदीपात्रातील कयाकिंगची सफर ही अलीकडे सुरू केलेली स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटी आकर्षणाचा बिंदू आहे. येथील किचन व बाथरूममधील सांडपाणी सुयश प्लांटद्वारे फिल्टर करून झाडांना वापरले जाते. शिवाय, किचन वेस्टपासून बायोगॅसची निर्मितीसुद्धा केली जाते.

'सकाळ महाब्रँड सन्मान' उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील आणि अभिनेते सयाजी शिंदे यांच्या हस्ते स्वीकारताना 'स्वरा ग्रुप'ची टीम

'मल्हार माची' आणि 'जलसृष्टी' ठरताहेत डेस्टिनेशन वेडिंग रिसॉर्ट्स

'मल्हार माची' आणि 'जलसृष्टी' या दोन्ही रिसॉर्टला ज्याची त्याची खासियत आहे. एक पाण्याच्या मधोमध, तर दुसरे डोंगरच्या कुशीत आणि अगदी धरणाच्या समोर. येथील युनिक गोष्टी आणि आल्हाददायक वातावरण, हिरवळ, शिवाय रिसॉर्टमध्ये असलेल्या सोयीसुविधा या डेस्टिनेशन वेडिंगच्या मागणीनुसार योग्य आणि पूरक ठरत असल्याने विवाहसोहळे व्यवस्थित पार पडत आहेत. 'मल्हार माची'मधील 'देवराई' आणि 'जलसृष्टी'तील 'तुळशी लॉन' खऱ्या अर्थाने अशा सोहळ्याचे आकर्षण ठरत आहेत. शिवाय, डोंगराच्या कुशीतील सह्याद्री मैदान किंवा देवराई लॉन येथे १,५०० ते २,००० पाहुण्यांची व्यवस्था होऊ शकते. छोटे समारंभ वा लग्नासाठी आमराई लॉन आणि सभागृह येथे १००-२०० पाहुण्यांची क्षमता आहे.

'मल्हार माची'चे एक्स्टेन्शन 'नभानंत'...

'मल्हार माची माऊंटन रिसॉर्ट'मध्ये 'नभानंत' हे नव्या आणखी आठ प्रीमियम रूम्ससह रेस्टॉरंट सुरू करण्यात आले आहे. तीस हजार स्क्वेअर फूट वॉटर बॉडी, लॉन, सुसज्ज रूम्स या श्रेणीत मिळणार आहेत. मुळशी डॅम व सभोवतलचा डोंगरदऱ्यांचा विनाअडथळा नजारा दिसतो. रिसॉर्टमध्ये असलेल्या नैसर्गिक सपाटीपासून आणखी चाळीस ते पन्नास फूट उंचावर या रूम्स बांधून अंतर्गत सजावटीने सजविल्या आहेत. या श्रेणीतील प्रत्येक रूमला खासगी स्विमिंग पूल आहे. पूलमध्ये दिला जाणारा ब्रेकफास्ट, बाहेरील निवांत बैठक, गार्डन आणि गार्डनमध्ये सर्व्ह केले जाणारे बार्बेक्यू, लायब्ररी ही वैशिष्ट्ये आहेत. रूममध्ये बाकरवडी, मखाणा, बाजरीची भेळ, असा स्नॅक्स असतो. तसेच बांबूपासून बनलेले टूथ ब्रश, कोळशापासून बनलेली पेस्ट, आयुर्वेदिक साबण अशा काही गोष्ट खास आहेत. शिवाय, या रूम्ससाठी स्वतंत्र लिफ्टची व्यवस्था केलेली आहे. बाल्कनीमध्ये बसून निसर्गाचा नजारा पाहत फूट मसाज करून घेणे, शेततळ्यामधील मत्स्यपालन, छोट्याशा झूमधील काही प्राणी, पक्षी, तसेच देवराईचा सुंदर नजारा अनुभवता येतो.

बाणेर येथील भैरवी प्युअर व्हेज रेस्टॉरंट

सेलिब्रिटी व उद्योजकांना 'स्वरा'चे आकर्षण

'स्वरा ग्रुप'च्या रिसॉर्टमधील दर्जेदार पदार्थांचा आस्वाद राजकीय नेते, उद्योजक, नाट्य-चित्रपट क्षेत्रातील कलावंत यांनीही घेतला आहे. त्यात उपमुख्यमंत्री मा. अजित पवार, तसेच सुभाष घई, अनुपम खेर, सचिन खेडेकर, सुबोध भावे, सचिन व सुप्रिया पिळगावकर, सोनाली कुलकर्णी, उर्मिला मातोंडकर, अतुल चोरडिया, डॉ. पराग संचेती, संगीतकार अजय-अतुल, सिद्धार्थ चांदेकर, उपेंद्र लिमये, स्वप्नील जोशी, गिरीश कुलकर्णी, नागराज मंजुळे, अमृता खानविलकर, मधुराणी प्रभुलकर, प्राजक्ता माळी, अवधूत गुप्ते, गश्मीर महाजनी अशा अनेक मान्यवरांचा समावेश आहे.

संस्कृतीचा वारसा जपणारे 'भैरवी प्युअर व्हेज'

भाऊंचे सुपुत्र विश्वास व राहुल यांनी २००२ साली बाणेरमध्ये 'भैरवी प्युअर व्हेज' हे रेस्टॉरंट सुरू केले. याच अनुभवाच्या बळावर 'मल्हार माची' आणि 'जलसृष्टी' ही भव्य रिसॉर्ट उभी राहिली. 'भैरवी'मध्ये गेली आठ वर्षे श्रावणात 'कबाब आणि बिर्याणी फेस्टिवल'चे, तर डिसेंबर महिन्याच्या गुलाबी थंडीत 'इंटरनॅशनल फूड फेस्टिवल'चे आयोजन केले जात आहे. चोखंदळ ग्राहकांच्या जिभेवर चव रेंगाळत ठेवणारे हे फेस्टिवल आहेत. शिवाय, अधूनमधून सणावाराला स्पेशल मेन्यूसुद्धा ठेवले जातात. 'स्वरा... चव यशाची'च्या अंतर्गत व्यवसायामध्ये यशस्वी झालेल्या आणि समाजासाठी स्फूर्ती ठरलेल्या अनेक मान्यवर व्यक्तींना येथील मंचावर आमंत्रित केले जाते. कल्याण भेळचे रमेश कोंढरे, चितळे समूहाचे इंद्रनील चितळे, मधुरा रेसिपीजच्या मधुरा बाचल आणि अगदी अलीकडे गोवर्धन घीचे प्रीतम शहा यांनी आवर्जून या कट्ट्याला भेट दिली आहे.

श्रावणात बिर्याणी महोत्सवाची आठवण म्हणून 'भैरवी प्युअर व्हेज'तर्फे एक सुंदर उपक्रम या महोत्सवात राबविला जातो. ग्राहकाला बेलाचे रोप भेट दिले जाते. दरवर्षी डिसेंबर महिन्यात इंटरनॅशनल फूड फेस्टिवलअंतर्गत थाई, मेक्सिकन, इटालियन, अरेबिक असे विविध पदार्थ व्हेज डिशेस स्वरूपात या महोत्सवात चाखता येतात.

'स्वरा' कुटुंबाचा महत्त्वाचा दुवा...

मनोहर धुमाळ मामा कामगार म्हणून ३५ वर्षांपूर्वी रुजू झाले, पण ते आता 'स्वरा' आणि मुरकुटे कुटुंबातील महत्त्वाचे सदस्य झाले आहेत. ॲग्रीकल्चर कोर्स आणि शेतीतील प्रत्यक्ष अनुभव गाठीशी बांधून मामा नव्वदच्या दशकात पुण्यात आले. शेती, जिम असो की 'भैरवी'ची उभारणी वा 'मल्हार माची', 'जलसृष्टी'ची पायाभरणी, मामा प्रत्येक गोष्टीचे साक्षीदार आहेत.

'स्वरा ग्रुप'च्या यशाचे भागीदार

'भैरवी रेस्टॉरंट' असो की 'मल्हार माची', 'जलसृष्टी रिसॉर्ट'च्या आतापर्यंतच्या प्रवासात ज्या काही माणसांची सोबत लाभली, त्यांच्यामुळे 'स्वरा'चा खडतर प्रवास अजून सुखकर झाला. त्यांनीसुद्धा 'स्वरा ग्रुप'ला आपले दुसरे घर समजून वेळोवेळी स्वतःला झोकून दिले. त्यापैकी ओंकार कटावटे यांचा 'स्वरा ग्रुप' विस्तारात मोलाचा वाटा आहे. ॲडमिन म्हणून जॉईन झालेले ओंकार यांनी पर्चेस, एचआर, सेल्स, मार्केटिंग अशा चौफेर भूमिका ग्रुपसाठी निभावल्या आहेत. कृष्णा बारू, गुणवंत तेलगोटे, गुंडू पाटील, शंकर आखाडे, अंकुश, ज्योतिबा, महेश मुरडेकर, सागर सुरवसे, रवींद्र धनावले, सदानंद गावडे, विनायक मयेकर, रूपम दास, सैफुल शेख, रघु, संजय स्वामी या सर्वांनी गेल्या १०-१२ वर्षांत आपआपल्या परीने 'स्वरा ग्रुप'साठी योगदान दिले आहे. टीमवर्क या भावनेला प्राधान्य देत सर्वजण 'स्वरा ग्रुप'च्या जडणघडणीत मोलाची कामगिरी बजावत आहेत.

जनसेवेचा वसा जपणारे 'स्वरा सोशल फौंडेशन'

माता, पिता, गुरुजन, मातृभूमीबरोबर समाजाचे ऋण नकळत आपल्यावर होत राहतात. म्हणूनच असे म्हणतात, की जेव्हा आणि जशी जमेल तशी सामाजिक मदत करीत राहावी. हाच विचार घेऊन 'स्वरा सोशल फौंडेशन'ची स्थापना करण्यात आली. गेल्या काही वर्षांत रक्तदान शिबिर, अनाथ आश्रमामध्ये जाऊन गुरुपौर्णिमा साजरी करणे, संभावे गावानजीक असलेल्या शाळांना शालेय साहित्य वाटप, तेथील काही गावांत दिवाळीनिमित्त ब्लँकेट वाटप, तसेच काही कर्मचाऱ्यांच्या मुलांचा दहावीपर्यंतचा शिक्षणाचा खर्च, काही विशिष्ट दिवशी अन्नदान, कामगारवर्गातील लोकांच्या गरीब, गरजू मुलांना रेस्टॉरंटमध्ये जेवायला आमंत्रित करणे, असे सामाजिक उपक्रम राबवीत समाजाचे ऋण फेडण्याचा प्रयत्न 'स्वरा सोशल फौंडेशन'कडून नेहमीच केला जातो. गेल्या तीन वर्षांपासून १ मे ते ३१ मे या कालावधीत उन्हात पायी फिरणारे वाटसरू, त्याचप्रमाणे दुचाकी स्वार, बसप्रवासी अशा अनेक लोकांना दिवसभरात हजार-बाराशे ग्लास कोकम, लिंबू सरबत, थंड पाण्याचे वाटप केले जाते. गेल्या दोन वर्षांपासून सोमेश्वरवाडी भागातील गोविंदा मंगल कार्यालयात बाणेर-औंधमधील लोकांसाठी रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, मोफत डोळे तपासणी व चष्मेवाटप केले जाते. रक्तदान शिबिरातून पहिल्या वर्षी २२०, तर दुसऱ्या वर्षी २६० जणांनी रक्तदान करून 'स्वरा फौंडेशन' साठी मोलाचा सहभाग नोंदविला आहे.

'स्वरा'चे ग्राहकांशी नाते आणि व्यावसायिक सिद्धांत

'भैरवी'ची बावीस वर्षे असो वा 'मल्हार माची', 'जलसृष्टी रिसॉर्ट', 'स्वरा ग्रुप'ला हॉस्पिटॅलिटी क्षेत्राचा किमान पंधरा वर्षांचा अनुभव आहे. उत्तरोतर वाढत गेलेल्या ग्राहकांच्या प्रतिसादामुळेच हा प्रवास केवळ सुखकर न ठरता अविस्मरणीय बनत गेला आहे. ग्राहक या शब्दापुरते मर्यादित न राहता नाती जोडत गेली. गोड आठवणी जपत कौटुंबिक नाती नकळत निर्माण झाली. नात्यात जिव्हाळा निर्माण झाला, की होणारा प्रवाससुद्धा छान होत राहतो. अधिक ऊर्जेने काम करण्यास हुरूप येतो. खरेतर अजूनही खूप दूरचा पल्ला गाठायाचा आहे, पण याबरोबरच 'स्वरा ग्रुप'चे व्यावसायिक सिद्धांत (Core Values) Abundant Mindset, Gratitude towards each other, Wholesome Indian Culture करण्याचा उद्देश (Purpose) इतरांच्या आनंदाचे कारण बनण्यात आनंद मिळविणे आहे. अशा 'कोअर व्हॅल्यूज आणि पर्पज जपण्याला 'स्वरा ग्रुप' प्राधान्य देत आला आहे.

(शब्दांकन : रविकांत पाटील)

कॉर्पोरेट ऑफिस :
स्वरा ग्रुप ऑफ हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स
हॉटेल भैरवी, चौथा मजला, २६३/२/१
वर्षा पार्क रोड, बाणेर, पुणे ४११ ०४५
- marcom@swaragroup.co.in
- Mobile: 98502 09199/ 88880 00055